३. माझ्या अंगणात

● ऐका. वाचा. म्हणा.

गहू शाळवाचं मोती
काळ्या रानात सांडलं,
आणि माझ्या अंगणात
लख्ख चांदणं पडलं ।।१।।

काळ्याशार मातीतुनी
मोती-पवळ्याची रास,
अंगणात माझ्या डुले
रानमेव्याची मिजास ।।२।।

दिला-घेतला वाढतो
रानातला रानमेवा,
तुम्ही आम्ही सारेजण
गुण्यागोविंदानं खावा ।।३।।

जीव दमतो, शिणतो
घास भरवते माय,
घरामंदी घरट्यात
जशी दुधातली साय ।।४।।

अंगणात आज माझ्या
दाणं टिपती पाखरं,
दूर उडुनिया जाता
आसू येती गालावर ।।५।।

ज्ञानेश्वर कोळी (जन्म-१९५६) : 'जगणे माझे', 'आयुष्याच्या वाटेवर', 'घन दाटलेले', 'छावणीच्या कविता', 'आकाश पेलताना' हे कवितासंग्रह; 'आठआण्याचा गुळ' हा कथासंग्रह प्रसिद्ध.

शेतकरी शेतात रात्रंदिवस काम करतो. जेव्हा त्यांच्या शेतात खूप धान्य पिकते, तेव्हा त्याला खूप आनंद होतो. प्रस्तुत कवितेतून शेतकऱ्याच्या मनातील विविध भावनांचे वर्णन कवीने केले आहे.

शिक्षकांसाठी : पाठ्यपुस्तकातील सर्व कविता तालासुरांत आनंददायी पद्धतीने विद्यार्थ्यांकडून म्हणून घ्याव्यात.

शब्दार्थ : शाळवाचं मोती – ज्वारीचे दाणे. **रास** – ढीग. **मिजास** – तोरा. **रानमेवा** – रानात पिकणारी फळे. **शिणणे** – दमणे, थकणे. **आसू** – डोळ्यांतील पाणी, अश्रू.

स्वाध्याय



प्र. १. खालील प्रश्नांची एक-दोन वाक्यांत उत्तरे लिहा.

(अ) कवीच्या अंगणात कशाकशाची रास पडते ?

(आ) रानमेवा कुठे उगवला आहे ?

(इ) कवी गुण्यागोविंदाने रानमेवा खायला का सांगत आहे ?

(ई) कवीच्या अंगणात पाखरे का येतात ?

प्र. २. खालील अर्थाच्या कवितेतील ओळी शोधा.

(अ) गहू, ज्वारीच्या राशीच राशी शेतात पडल्या आहेत.

(आ) काळ्याभोर मातीतून टपोरे, दाणेदार असे खूप सारे धान्य पिकते.

(इ) शेतातून काम करून दमून आल्यावर आई घास भरवते.

(ई) रानातला रानमेवा एकमेकांना देत, घेत आनंदाने खाऊया.

प्र. ३. तुम्ही पाहिलेल्या एखाद्या धान्याच्या शेताचे वर्णन थोडक्यात लिहा.

चर्चा करा. सांगा.

- **रानमेवा कशाला म्हणतात? रानमेव्यात कोणती फळे येतात, याविषयी कुटुंबातील व्यक्तींशी चर्चा करा.**

खेळूया शब्दांशी.

(अ) कंसात दिलेल्या पर्यायांतून योग्य पर्याय निवडून वाक्ये पुन्हा लिहा.

(१) काळ्याशार मातीतुनी मोती-पवळ्याची...............
(मिजास, आस, रास)

(२) घरामंदी घरट्यात जशी दुधातली................
(माय, साय, जाय)

(३) दूर उडुनिया जाता, आसू येती................
(गालावर, सारेजण, घरट्यात)

(आ) समूहदर्शक शब्दांची यादी करा.

उदा., धान्याची रास

(१) लाकडाची (३) केळीचा (५) मुलांचा

(२) पक्ष्यांचा (४) प्राण्यांचा (६) द्राक्षांचा

(इ) खालील शब्दांसाठी शेवट समान असणारे कवितेतील शब्द लिहा.

(अ) सांडलं (आ) रास (इ) माय

(ई) खालील शब्दांसाठी प्रमाणभाषेतील शब्द लिहा.

(अ) खावा (आ) माय (इ) घरामंदी (ई) आसू

उपक्रम :

तुमच्या परिसरातील एखाद्या अनुभवी शेतकऱ्याची तुम्हांला मुलाखत घ्यायची आहे, त्यासाठी प्रश्नावली तयार करा.

खेळ खेळूया.

- **'स' चा शब्दपंखा पूर्ण करा.**



(१) वर्णमालेतील बत्तीसावे अक्षर.
(२) जंगलातील एक भित्रा प्राणी.
(३) नेहमी.
(४) एक शीतपेय.
(५) रस्ता.
(६) उत्सव.
(७) ढीग या शब्दासाठी कवितेत आलेला शब्द. रा...

कविता करूया.



वरील आकृत्यांमध्ये गोलात दिलेल्या शब्दांशी संबंधित काही शब्द दिलेले आहेत. त्या शब्दांचे निरीक्षण करा. यांमध्ये शेवट समान असणारे काही शब्द आहेत.

उदा., खेळ, मेळ, नारळ
सण, तोरण, सारेजण
दार, घर, सुंदर

अशा शब्दांना यमक जुळणारे शब्द म्हणतात.

या शब्दांचा वापर करून आपल्याला लयबद्ध वाक्ये तयार करता येतात.

उदा., घराभोवती प्रशस्त अंगण,
जमले तेथे सारेजण,
सडा, रांगोळी अन् तोरण,
साजरे करतो सगळे सण.

याप्रमाणे वरील आकृत्यांमध्ये दिलेल्या इतर शब्दांचा उपयोग करून कवितेच्या ओळी तयार करा.